# ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना

( एकमेव मान्यताप्राप्त युनियन )

मित्रहो,

ऑफशोअरमध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देत आहोत कि, मॅनेजमेंटने काही महिन्यापूर्वी SBT (Self Booking Tool) बाबत एक परिपत्रक काढून ओएनजीसीतील सर्व कर्मचाऱ्यांकरीता लागणाऱ्या विमानाच्या तिकीट्स या केवळ बामर लौरी याच कंपनीकडून घ्याव्यात असे अनिवार्य केले. मॅनेजमेंटच्या सदर निर्णयामुळे ऑफशोरमधील कर्मचाऱ्यांना तिकीट्स बुक करताना अडचणी येवू लागल्या व कर्मचारी संघटनेकडे वारंवार यासंबंधीतील तक्रारी येत होत्या. या सर्व तक्रारींची दखल घेवून कर्मचारी संघटनेने दि. ४ नोव्हें. २०१६ रोजी मॅनेजमेंटला एक पत्र लिहिले. (संदर्भ क्र. 146/2016) मॅनेजमेंटने सदर पत्राची दखल घेत दि. १३ डिसेंबर २०१६ रोजी NBP Green Heights येथे एक संयुक्त सभा आयोजित केली. सदर सभेस श्री. गोपीनाथ, ED-HRO, श्री. मनोज बर्तवाल, GM-Head Corporate Communication-Head Quarter, श्री. आर. पी. दूबे, GM-RO I/c HR/ER, सर्व ॲसेटचे HR Heads तसेच ICE TEAM-Head Quarter व बामर लौरीचे प्रतिनिधी तसेच कर्मचारी संघटनेतर्फे सरचिटणीस मा. श्री. प्रदीप मयेकर, उपाध्यक्ष श्री. पराग कदम, चिटणीस श्री. प्रवीण शेट्ये, श्री. प्रदीप म्हाडगुत आदी पदाधिकारी उपस्थित होते. आईस टीम तसेच बामर लौरी च्या प्रतिनिधीने SBT बाबत सदर सभेत एक प्रेझेंटेशन सादर करुन या नविन प्रक्रियेमुळे ओएनजीसीच्या करोडो रुपयांची कशा प्रकारे बचत होत आहे हे दाखविण्याचा प्रयत्न केला. असे असले तरी या प्रक्रियेमुळे ऑफशोरमधील कामगारांना जो त्रास व विलंब तसेच वेळेचा अपव्यय होत आहे तो कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींनी मॅनेजमेंटच्या निर्दशनास आणून दिला. यावर तातडीचा उपाय म्हणून बामर लौरीचे कार्यालय त्वरीत हेलिबेस येथे सुरु करण्याचे निश्चित करण्यात आले. वेबआईसमध्ये ट्रिप मॉडीफिकेशन सध्या दोन दिवसांपर्यंत स्वत:ला करता येते. ही मर्यादा सात दिवसांपर्यंत करावी अशी कर्मचारी संघटनेतर्फे मागणी केली असता याबाबत Head Quarter ला कळविण्याचे ठरविण्यात आले. ईस्ट कोस्ट मध्ये असलेल्या तीन रीग्जबाबत त्या सेक्टरमध्ये कार्यरत असलेल्या तीन विमान कंपन्या जोवर बामर लौरीच्या पटलावर येत नाहीत तोवर सदर कंपन्यांचे बाहेरुन काढलेले तिकिट मंजूर करण्याचे निर्देश संबंधितांना देण्यात येतील असे ठरले. तसेच इंटरनेट सिग्नल अधिक सक्षम करण्याबाबतचे निर्देश संबंधितांना दिले गेले. विमानाची वेळ व रुट याबाबत काही समस्या असल्यास त्या सोडविण्याचे वचन मा.श्री. गोपीनाथ, ED-HRO यांनी कर्मचारी संघटनेस दिले. व लवकरच एक रिव्ह्यू मिटींग घेण्याचे आश्वासन मॅनेजमेंटने दिलेले आहे.

धन्यवाद !

**कामगार एकता झिंदाबाद !**

**कर्मचारी संघटना झिंदाबाद !!**

**अध्यक्ष : प्रकाश दळवी** **सरचिटणीस : प्रदीप मयेकर**